


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. १४ एप्रिल २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १९५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

1 साडी घ्या
1 साडी मोफत मिळवा.
1 रेडीमेड कुर्ती घ्या
2 मोफत मिळवा
2 रेडीमेड ड्रेस घ्या
3 मोफत मिळवा.



संध्याकाळच्या गर्दीपेक्षा खरेदीला सकाळी यावे.
क्रांती साडी सेंटर
5, जनता शॉपिंग सेंटर, नवीपेठ, सोलापूर.

## ‘शिवरत्न’ १५ वर्षानंतर नटलाय... सजलाय... शहारलाय!

## प्रवेशपूर्व स्नेहभोजनाला राजकीय रणनीतीचं तोंडी लावणं!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**अकलूजचा ‘शिवरत्न’ बंगला सजलाय, नटलाय! नव्या दिशेच्या नव्या राजकारणाचा अध्याय लिहण्यासाठी सज्ज झालाय! शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि विजयसिंह मोहिते पाटील यांचा तब्बल १५ वर्षानंतर सहवास लाभणार असल्यानं शहारलाय! आजच्या स्नेहभोजनातील प्रवेशाची तयारी अन् माढा, बारामती, सोलापूर या तीनही लोकसभा मतदारसंगातील रणनीती तोंडी लावण्याच्या स्वादाच्या कल्पनेनं खुळावलाय! सोलापूर जिल्ह्यातील राजकारण आणि त्यातून महाराष्ट्राची दिशा ठरवणाऱ्या अनेक घडामोडींचा साक्षिदार असलेला, अन् त्यानंतर बरीच वर्ष ‘विजनवासात’ असणारा ‘शिवरत्न आजच्या प्रसंगासाठी आसुसलाय!**


# प्रवेश

## आज धैर्यशीलांचा मंगळवारी दादांचा!

‘शिवरत्न’च्या साक्षीनं आज सकाळच्या सत्रात पवार, शिंदे आणि मोहिते पाटील यांच्यात ‘डिनर डिप्लोमसी’ होईल आणि त्यानंतर चार वाजता ‘शिवरत्न’वर जमणाऱ्या हजारो समर्थकांच्या साक्षीने मोहिते पाटील परिवाराचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश होईल. आज ‘शिवरत्न’वर वाजणाऱ्या तुतातरीची कंपने साऱ्या महाराष्ट्रभर पसरतील हे नक्की.

### जिल्ह्याच्या राजकारणाचा नवा आयाम

सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय दृष्टीने अत्यंत महत्वाचे असणारे ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि विजयसिंह मोहिते-पाटील हे साधारणत: २००९नंतर म्हणजे तब्बल १५ वर्षानंतर शंकरनगरच्या ‘शिवरत्न’ बंगल्यावर एकत्र येत आहेत. वास्तविक, बदलेली राजकीय पार्श्वभूमी आणि त्यामध्ये होत असलेली लोकसभेची निवडणूक यातून हे दिग्गज नेते एकत्र येत आहेत, असं मानलं जात असलं तरी विषय त्यापेक्षाही पुढचा आहे. पवार, मोहिते-पाटील आणि शिंदे यांच्या एकत्र येण्यातून सोलापूर जिल्ह्याच्याच राजकारणाला नवी दिशा आणि कलाटणी मिळणार आहे. या मातब्बर तिन्ही नेतेमंडळींचं नेतृत्व या जिल्ह्याला पुन्हा लाभणार आहे. नव्या दिशेच्या राजकारणाचा नवा अध्याय सुरु होणार आहे.




### लोकसभेची रणनिती

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात जेव्हा जेव्हा अनेक पेचप्रसंग निर्माण झाले, त्यावेळेला शंकरनगरच्या ‘शिवरत्न’ बंगल्यावर जिल्ह्यातील मातब्बर मंडळी एकत्रित जमायची. ‘शिवरत्न’वर स्नेहभोजन व्हायचे आणि अनेक प्रश्न, निर्णय मार्गी लागायचे. सोलापूर जिल्ह्यावर मोहिते-पाटलांची ज्यावेळी कमांड होती, त्यावेळी या जिल्ह्यात जे काही विकासाचं, राजकीय नेतृत्वाचं जे काही झालं ते ‘शिवरत्न’ बंगल्यावर. हा बंगला तसा आजवरच्या अनेक घडामोडींचा साक्षीदार ठरला. दरम्यान आजदेखील हाच शिवरत्न बंगला एका मोठ्या राजकीय घडामोडीचा आणि सोलापूर जिल्ह्याला दिग्गज पवार, मोहिते-पाटील आणि शिंदे यांचं एकत्रीत नेतृत्व सोलापूर जिल्ह्याला लाभण्याच्या गोष्टींचा साक्षीदार ठरणार आहे.

बारामतीकर शरद पवार आणि अकलूजकर मोहिते-पाटील यांच्यामधील तुटलेल्या संबंधांची वीण पुन्हा एकदा राजकीय प्रवाह बदल्यानंतर घट्ट होणार आहे. माढा, सोलापूर आणि बारामती लोकसभा मतदार संघाच्या अनुषंगाने,

महाराष्ट्राच्या राजकारणातील तीन मातब्बर नेते २००४ नंतर पुन्हा एकदा अकलूजला एकत्र येत आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि मोहिते पाटील हे धुरंदर नेते आज शिवरत्न वर स्नेहभोजनासाठी एकत्र येत आहेत. या ‘डिनर डिप्लोमसी’ मध्ये माढा, सोलापूरसह, बारामती लोकसभा मतदार संघाच्या राजकीय घडामोडींची चर्चा तर होऊ शकते. परंतु, या तिन्ही मतदारसंघाच्या राजकीय डावपेचांची रणनिती आखली जाऊ शकते. एकेकाळी या तिन्ही मतदारसंघांवर नेतृत्व असणारी ही नेतेमंडळी. तथापि, काळाच्या ओघात या मतदारसंघावरची पकड थोडीशी सैल झालेली. अशातच आपल्या पुढच्या पिढीसाठी या तिन्ही मातब्बर नेत्यांनी पुन्हा एकदा राजकारणाच्या आखाड्यात शड्डू ठोकला आहे. आज शिवरत्न बंगल्यावर एकत्रीत येणं हे त्याचे द्योतक.






### नियोजनाचा अकलूज पॅटर्न

कोणत्याही कार्यक्रमाचं, बैठकीचं, स्पर्धांचं नियोजन करण्यात मोहिते-पाटील पॅटर्नचा हातखंडा आहे. महाराष्ट्र नव्हे तर देशभर वेगवेगळ्या निमित्तानं त्यांचा नियोजनाचं आजवर कौतुक झालं. मोहिते-पाटील ब्रँडच्या नियोजनाची अनुभती आजदेखील शिवरत्न बंगल्यावर बघायला मिळणार आहे. आज शनिवारी रात्री उशीरापर्यंत शिवरत्नवर बंगल्यावर बैठकीच्या आयोजनाची तयारी चालू होती. माढा मतदार संघासह, मोहिते-पाटलांना मानणारा राज्यभरातील कार्यकर्ता आजच्या बैठकीला येऊ शकतात. त्याला संदर्भदेखील तसाच जोडला जात आहे. आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या भाजप प्रवेशावेळी राज्यभरातून त्यांचे समर्थक राहिले होते.

राजकारणातील बदलत्या प्रवाहानंतर अनेक दिवसांनी शरद पवार हे शंकरनगरच्या मोहिते-पाटील यांच्या शिवरत्न बंगल्यावर स्नेहभोजनासाठी येत आहेत. त्यावेळी मोहिते-पाटील यांच्याविषयी ते काय बोलतात? याकडं सर्वांचं लक्ष आहे. मोहिते-पाटील यांच्यासह माढा मतदार संघाचं पालकत्व घेण्याबद्दल पर्यायानं भाजप विरोधात बंडाचं निशाण फडकाविणाऱ्या मोहिते-पाटील यांना बळ देण्याबद्दल शरद पवार कोणती भूमिका मांडतील हे पाहणं महत्वाचं आहे. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या माढ्यातून लढण्याच्या उठलेल्या वादळापासून आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा ‘शिवरत्न’ बंगल्यावर जादा राबता नाही. भाजपानं उमेदवारी नाकारल्यानंतर ‘शिवरत्न’वर जे शक्तीप्रदर्शन झालं त्या दिवशी मंत्री गिरीश महाजन यांच्या स्वागताला दिसलेले रणजितदादा पुढं शिवरत्नवर दिसले नाहीत. मात्र, ज्येष्ठ नेते शरद पवार, सुशीलकुमार शिंदे यांच्या स्नेहभोजनाला ते असणार का? याबद्दलदेखील तेवढेच औत्सुक्य आहे...




धैर्यशीलभैय्यांची सोशल मिडीयावरील पोस्ट

### धैर्यशीलभैय्या बोलणार ते अगदी भरभरूनच...

माढा लोकसभा निवडणुकीचे नागरे जेव्हांपासून वाजू लागले अगदी तेव्हांपासून प्रत्येक वेळी ‘नो कमेंटस आणि वेट ॲन्ड वॉच’ एवढंच सांगण्यात धन्यता मानणाऱ्या धैर्यशील मोहिते-पाटील यांनी उद्या रविवारी सर्व काही बोलू, माध्यमांच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देऊ, असं आज शनिवारी माध्यमांसमोर सांगितलं. त्यानुसार, धैर्यशील मोहिते-पाटील आपल्या मनातील कोणत्या गोष्टींची उकल करतात, भाजपनं केलेल्या अन्यायाची मनातील खदखद कशी व्यक्त करतात? खास करुन आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या भूमिकेबद्दल काय बोलतात? हे सगळं पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

### समर्थकांना आवताण

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश करण्याच्या पार्श्वभूमीवर चर्चा आणि प्रत्यक्ष प्रवेश याबद्दल ‘शिवरत्न’ बंगल्यावर उपस्थित राहण्याबद्दल खुद्द धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आज सोशल मीडियावर पोस्ट झळकावली. मात्र या पोस्टमध्ये शरद पवार गटामधील प्रवेशासंदर्भात थेट उल्लेख त्यांनी टाळला.

**‘‘तुम्ही या... आम्हाला बोलायचं आहे...!**
तुमच्या सहमतीने निर्णय घेऊया... त्यासाठीच भेटू उद्या दि. १४/०४/२०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता ’’
हा मेसेज प्रत्येक कार्यकर्त्याच्या स्टेटसला दिसला. जो तो कार्यकर्ता उद्या चार वाजता काय होणार यापेक्षा आपल्या मनातलंच होणार आहे. यासाठी प्रत्येकाला निरोप देऊ लागल्याचे दिसले. ‘उद्या यावं लागतंय, यायचंयच’ अशा पद्धतीने एकमेकांना निरोप धाडण्यात आले.

### विजयदादा, रणजितसिंह आज राहणार मागे!

‘शिवरत्न’वर सकाळची ‘डिनर डिप्लोमसी’ संपवून शरद पवार आणि सुशीलकुमार शिंदे त्यांच्या पुढील दौऱ्यासाठी रवाना होतील; ‘शिवरत्न’वर चार वाजेपर्यंत मोहिते पाटील समर्थकांची गर्दी उसळेल. मोहिते पाटील या समर्थक कार्यकर्त्यांशी चर्चा करतील आणि त्यानंतर राष्ट्रवादी (तुतारी) चे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत तेथेच विजयसिंह मोहिते पाटील आणि रणजितसिंह मोहिते पाटील वगळता धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह संपूर्ण मोहिते पाटील कुटुंबीय राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करतील. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उमेदवारीनंतर ज्यावेळी शरद पवार यांचा दौरा होईल (शक्यतो १६ तारखेला) त्यावेळी विजयसिंह मोहिते पाटील आणि रणजितसिंह मोहिते पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षात अधिकृत प्रवेश होईल.

### विजयासाठी प्रयत्न: रघूनाथराजे

रामराजे निंबाळकर यांची भूमिका चुकीची असेल तर राजकारणातून संन्यास घेईन असं रघूनाथराजे निंबाळकर यांनी आज अकलूजमध्ये सांगत भाजपला आमचा विरोध नसून या पक्षानं माढा लोकसभेसाठी उमेदवारी दिला आहे, त्या उमेदवारीला विरोध आहे, असं त्यांनी सांगितलं. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी आलेले निंबाळकर यांनी माध्यमांसमोर आपली भूमिका मांडली. आम्ही युतीचा धर्म पाळणार नाही तर माढ्यातून धैर्यशील मोहिते-पाटील यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही रघुनाथराजेंनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. रघुनाथराजे निंबाळकर हे ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांचे बंधू आहेत.

---

# ‘त्या’ वेळी डोळ्यात तरळलेले अश्रु अन् आत्ताची डोळ्यापुढची निवडणूक



**कुमठ्याच्या श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या चिमणी पाडण्याचा विषय लोकसभा निवडणुकीच्या निमित्तानं पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, अक्कलकोट आणि मोहोळ या चार तालुक्यातील साधारण २७ हजार शेतकरी सभासद आणि त्यांचे कुटुंबीय याचं वाटोळं करण्यास कारणीभूत ठरलेल्या सत्ताधारी भाजपला किंमत दाखवायची वेळ आली आहे. लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला चारी मुंड्या चित करा, असं आवाहन करत कारखान्याचे सर्वेसर्वा धर्मराज काडादी यांनी कारखान्याचे शेतकरी सभासद आणि त्यांच्या परिवारात आत्मभान जागृत करण्यासाठी हालचाली सुरु ठेवल्या आहेत. चिमणी पाडकामावेळी ‘डोळ्यात तरळलेले अश्रु अन् आताची डोळ्यापुढची निवडणूक’ या पार्श्वभूमीवर, संबंधित शेतकरी सभासद आणि त्यांच्या परिवारामधील सदस्य कोणता निर्णय घेतात, हे पाहणे महत्वाचं आहे.**



दरम्यान, चिमणी पाडकामाचा आकस मनात धरुन संबंधित चार तालुक्यातील कारखान्यांचे २७ हजार सभासद आणि त्यांच परिवारातील मतदार सदस्य यांनी भाजपाविरोधी भूमिका घेऊन मतदान करण्याचा निर्णय घेतल्यास महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्यासाठी अडचण होईल, असं मानलं जात आहे. कारखान्याच्या चिमणीचा विषय ऐन निवडणुकीत ऐरणीवर आणून धर्मराज काडादी यांनी भाजपची डोकेदुखी वाढविल्याची चर्चादेखील सुरु झाली आहे.

धर्मराज काडादी यांनी बोलाविलेल्या या बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे, माजीमंत्री सिद्धराम म्हेत्रे, माजी आमदार सिद्धराम म्हेत्रे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश सरचिटणीस शंकर पाटील, काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अमर पाटील, केदार उंबरजे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, रामदास फताटे, सिद्धाराम चाकोते यांच्यासह लिंगायत समाजामधील नेते, पुढारी, प्रमुख कार्यकर्ते, कारखान्याचे संचालक आदी उपस्थित होते.

या बैठकीत श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या चिमणी प्रकरणी आमदार प्रणिती शिंदे यांनी पार पाडलेल्या भूमिकेचे कौतुक करण्यात आलं. चिमणी पाडकामानंतर कामगार आणि शेतकरी सभासद यांना दिलासा देण्याबरोबरच राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात प्रणिती यांनी चिमणी पाडकामावर उठविलेला आवाज याबद्दल धर्मराज काडादी यांच्यासह सर्वच उपस्थितांनी त्यांची प्रशंसा करीत लोकसभेच्या निवडणुकीत प्रणितींच्या पाठिशी मतांची ताकद उभी करण्याचा निर्धार केला.



### बदला घेण्याचाच काडादींचा थेट एल्गार

दक्षिण, उत्तर सोलापूर, मोहोळ आणि अक्कलकोट या चार तालुक्यातील २७ हजार शेतकरी सभासदांचे संसार उद्ध्वस्त करण्यासह आपणास त्रास दिला. विमानसेवेच्या आडून चिमणी पाडण्याचं वेगळे राजकारण केलं, त्या भाजपला चारी मुंड्या चीत करा आणि महाविकास आघाडीच्या उमेदवाराच्या पाठिशी उभा राहा, भाजपचा बदल घ्या, असा थेट एल्गार धर्मराज काडादी यांनी पुकारत कारखान्याच्या शेतकरी सभासदांमध्ये तसा प्रचार सुरु केलाय.

### नेतृत्वाची एकवटली ताकद

सिद्धेश्वर साखर कारखाना हा लिंगायत समाजाच्या श्रद्धेचा भाग आहे. या कारखान्याशी या समाजाच्या अत्यंत आपुलकीच्या, श्रद्धेच्या भावना गुंतलेल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर धर्मराज काडादी यांनी लिंगायत समाजाच्या सर्व नेतेमंडळींची बैठक घेतली. या बैठकीत कारखान्याच्या चिमणीचं पाडकाम आणि लोकसभेच्या निवडणुकीत भाजपला धडा शिकविण्याचा विषयावर चर्चा घडवून आणली. भाजपच्या विरोधात मतदान करण्यावर या बैठकीत सर्व उपस्थित नेतेमंडळींनी शिक्कामोर्तब केले.